## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

**'STARS' प्रकल्पांतर्गत**

# संकलित मूल्यमापन २ : २०२३-२४ : सराव प्रश्नपत्रिका

## इयत्ता - आठवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________ **हजेरी क्रमांक :** [ ]

**शाळेचे नाव :** ______________________ **तुकडी :** ________

**केंद्र :** ____________ **ता.** ____________ **जि.** ____________ **दिनांक :** / /२०२४

**अध्ययन निष्पत्तीनिहाय व प्रश्ननिहाय गुणनोंदणी तक्ता**

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | 08.01.01 | 08.01.02 | 08.01.03 | 08.01.05 | 08.01.08 | 08.01.09 | 08.01.10 | 08.01.12 | 08.01.13 | 08.01.14 | 08.01.15 | 08.01.18 | तोंडी गुण | लेखी गुण | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १ ते ३ | ४ ते १२ | १ ते १२ | |
| निर्धारित गुण | २ | ५ | ३ | ६ | ६ | ५ | ९ | ४ | ३ | ५ | ५ | ७ | १० | ५० | ६० | |
| एकूण प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | | | | |

### तोंडी चाचणी

**प्र. १) तुझ्या परिसरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या कोणत्याही एका सणाबद्दल माहिती सांग. (गुण २)**

**प्र. २) खालील बातमी वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)**

**दिनांक : २० डिसेंबर** ***लोकप्रतिभा***

***चित्रकला शिबिराचा समारोप***

**उत्रौली (ता. भोर) :** उत्रौली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. १९ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. या शिबिराची सांगता प्रसिद्ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या सप्रात्यक्षिक मनोगताने करण्यात आली.

आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती-ना-कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनी भूषवले. कलाशिक्षिका श्रीमती सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

या निमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

**अ)** समारंभाचे प्रमुख पाहुणे कोण होते ते सांग? (गुण १)

**आ)** कला प्रदर्शनास कोणी प्रतिसाद दिला ते सांग ? (गुण १)

**इ)** शिबिराचा सांगता समारंभ कोणाच्या हस्ते पार पडला ते सांग? (गुण १)

**ई)** वरील बातमीमध्ये ज्या ज्या गोष्टींविषयी माहिती दिली आहे ते ते घटक सांग? (गुण २)

**प्र. ३) दिलेली कविता वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची तोंडी उत्तरे दे. (गुण ३)**


**संगणक**

घरीच माझ्या
संगणक आणणार,
अचूक गणित
त्यावर करणार.

सुबक, सुंदर
काढणार चित्र,
देश-विदेशांत
जोडणार मित्र.

संगणकाद्वारे आता
संवाद साधणार,
दूरच्या व्यक्तीचा
चेहरा बघणार.

घरीच बसून
जग बघणार,
व्यवहार सारे
झटपट करणार.



**- बबन शिंदे**

**अ)** 'संगणक' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करून सांग. (गुण १)

**आ)** संगणकाच्या मदतीने काय काय शिकता येणार आहे ते सांग. (गुण २)

## लेखी चाचणी

**प्र. ४) खालील संवाद वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ६)

(शाळेच्या मधल्या सुट्टीत नेहा व सायली या दोन मैत्रिणींमध्ये झालेला हा संवाद)

**नेहा** : सायली, स्वातंत्र्यदिन-प्रजासत्ताक दिन या शब्दांमधील 'दिन' शब्दाचा अर्थ 'दिवस' असा आहे, हो ना गं?

**सायली** : हो.... असाच आहे. का गं?

**नेहा** : अगं, मागच्या धड्यात हा शब्द आला होता, तेव्हा बाईंनी या शब्दाचा अर्थ सांगितला होता 'गरीब'!

**सायली** : दोन्ही शब्द नीट बघितलेस का तू? कसे लिहिले आहेत ते ?

**नेहा** : आपण आता पुस्तकातच बघूया. शब्द कसा लिहिलाय ते....

**सायली** : हं. हा बघ मागचा धडा.... आणि हा शब्द 'दीन' !

**नेहा** : अरे हो, दोन्ही शब्द लिहिण्यात फरक आहे.

**सायली** : बरोबर! 'दीन' शब्दात 'दी' दीर्घ आहे. 'दीन' म्हणजे गरीब. 'दिन' शब्दात 'दि' ऱ्हस्व आहे. 'दिन' म्हणजे दिवस.

**नेहा** : शब्दांची किती गंमत आहे ना ! अक्षरांत वरवर साम्य आहे; पण लेखनातल्या फरकामुळे अर्थात केवढा फरक!

**सायली** : आपण दोघी जणी असे नवीन शब्द आणि त्यांचे विविध अर्थ रोज समजून घेऊया.

**नेहा** : अगं पण कसे? आपल्याला सारखे आपल्या बाईंकडे जावे लागेल अर्थ विचारायला !

**सायली** : अगं नाही. मला माहीत आहे त्याची गंमत. शब्दांचे अर्थ आपले आपण कसे शोधायचे ते मी तुला दाखवते.

**अ)** वरील संवादात प्रत्यक्ष किती व्यक्ती सहभागी आहेत ? (गुण १)

..........................................................................................

**आ)** खाली दिलेला शब्द वापरून वेगवेगळ्या अर्थाची दोन स्वतंत्र वाक्ये लिही. (गुण २)

१) दीन : ..........................................................................

२) दिन : ..........................................................................

**इ)** नवीन शब्द आणि त्यांचे विविध अर्थ समजून घेण्यासाठी तू कशाकशाची मदत घेशील ते लिही. (गुण ३)

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ५) खालील उतारा वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ६)**

फुलांचे नि फुलपाखरांचे आयुष्य ते किती आणि त्या मानाने त्यांनी त्या आयुष्याकरिता दाखवलेली आस्था किती? फुलांचे आयुष्य, अगदी झेनियाचे फूल झाले, तरी काही दिवसांचे. फुलपाखरांचेही तसेच. मनुष्याचे आयुष्य या दृष्टीने पाहिले असता अनेक पटींनी मोठे मानावे लागेल. एवढे मोठे आयुष्य लाभलेल्या मनुष्याने कितीतरी समाधानी व आनंदी असावयास हवे. अडचणींनी आणि रोगांनी भांबावून जाण्याचे त्याला काय कारण आहे? अडचणी, रोग, संकटे ही काही कायमची नसतात ना? मग त्यांच्याकडे सोशिकपणाने, खिलाडू वृत्तीने आपणांस का पाहता येऊ नये?

अडचणी, संकटे, रोग यांचे जेव्हा आपल्यावर आक्रमण होते, तेव्हा ती फार मोठी किंवा असह्य वाटतात; परंतु ती ओसरल्यावर, आपण त्यांना का घाबरलो तेच आपणांस समजत नाही. आपण घाबरलो याचे कारण आपल्याजवळ मनाची स्थिरता किंवा शांती नसते. जीवन म्हणजे संकटे नव्हेत, रोग नव्हेत, अडचणी नव्हेत, कारण ती असतानाही जीवन चालू असते.

**अ)** सूचनेनुसार कृती कर. (गुण १)

अडचणी, संकटे, रोग यांच्याकडे पाहण्याची वृत्ती कशी असावी? योग्य पर्यायाला गोल कर.

अ) समाधानी आणि आनंदी ब) सोशिक व खिलाडू क) उत्साही व स्फूर्तिदायक

**आ)** साम्य ओळख. (गुण २)

१) फुले : ..........................................

२) फुलपाखरे : ..........................................

**इ)** आनंदी व समाधानी जीवन जगण्यासाठी काय करावे असे तुला वाटते ते लिही. (गुण ३)

..........................................

..........................................

..........................................

**प्र. ६) सूचनेनुसार कृती कर. (गुण ५)**

**अ)** 'दार' हा प्रत्यय लावून एक शब्द तयार कर. .............................. (गुण १)

**आ)** 'त्व' हा प्रत्यय लावून एक शब्द तयार कर. .............................. (गुण १)

**इ)** खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिही. (गुण १)

पायात चप्पल न घालता : ..........................................

**ई)** खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखून लिही व तो वाक्प्रचार वापरून नवीन वाक्य तयार कर. (गुण २)

राजीवने आई-वडिलांची सेवा करून त्यांचे पांग फेडले.

वाक्प्रचार : ..........................................................................

वाक्य : ..........................................................................

**प्र. ७) दिलेल्या सूचनेनुसार उत्तरे लिही. (गुण ९)**

**अ)** खालील कविता वाच व त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ६)

कडीस जोडोनि दुज्या कडीला
मनुष्य बनवीतसे साखळीला
जरी तोडिले त्यात मधल्या कडीला
तरी भंगुनी जाई संपूर्ण माला! ।।१।।

पाहा कसे कोळि विणतात जाळे
धाग्यास एका बहू जोडलेले
बहुतांस त्या जोडलेले कित्येक
बिघडते न जरिही तुटले अनेक ।।२।।

एकीस खायी दुजी प्राणिजात
दुजीस तीजी अशी साखळीत
जर का दुजी जात मेली समस्त
उभी साखळी होउनी जाय नष्ट ! ।।३।।

निसर्गनारायणें देखिले हे
अन् वीणिले अन्नजालासि पाहे!
जरी प्राणिजाती किती लोपल्या रे
तरिही टिकोनी महाजाल राहे! ।।४।।

तगले असे की महाजाल रे ते
तरीहि जाणा ते क्षीण होते!
मारीत जाता बहू प्राणिजाती
तुटोनि संपेल ते जाल पुढती! ।।५।।

१) 'अन्नजाल' याचा तुला समजलेला अर्थ लिही. (गुण २)

..........................................................................

..........................................................................

२) अन्नजाल क्षीण होत चाललेले आहे, कारण - (गुण २)

..........................................................................

..........................................................................

३) निसर्गातील अन्नजाल टिकवून ठेवण्यासाठी आपण काय करू शकतो, यावर तुझे विचार लिही. (गुण २)

..........................................................................

..........................................................................

**आ)** तुमच्या शाळेत 'अपूर्व विज्ञान मेळावा' आयोजित केला आहे. त्याला भेट देण्यासाठी मित्राला पत्र लिही. (गुण ३)


..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ८) खालील जाहिरातीचे वाचन करून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ४)**




**अ)** वरील जाहिरात कोणासाठी आहे? (गुण १)

..........................................................................................

**आ)** जाहिरातीचा विषय कोणता आहे ? (गुण १)

..........................................................................................

**इ)** जाहिरात अधिक आकर्षक होण्यासाठी आणखी कोणत्या घटकांचा समावेश करता येईल ते लिही. (गुण २)

..........................................................................................

..........................................................................................

प्र. ९) **दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांसाठी सूचना देणारा कमीत कमी तीन सूचनांचा सूचनाफलक तयार कर.** **(गुण ३)**

**सूचनाफलक**

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

प्र. १०) **खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'माझी आवडती कला' ( उदा. चित्र, संगीत, नाट्य, शिवण, गायन इ.) या विषयावर आठ ते दहा ओळींत निबंध लिही.** **(गुण ५)**

**मुद्दे :** कलेचे महत्त्व – माझी कला – कलेची ओळख – कलेचा सराव – कलेचे फायदे – कलेतून मिळणारा आनंद – करिअर निवड.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

प्र. ११) **'तू अनुभवलेली सहल' या विषयावर आठ ते दहा वाक्ये लिही.** **(गुण ५)**

.......................................................................................

.......................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

**प्र. १२) सूचनेनुसार कृती कर.** **(गुण ७)**

**अ)** १) खाली दिलेल्या वैशिष्ट्यावरून अलंकाराचे नाव लिही. (गुण १)

वैशिष्ट्य : उपमेय व उपमान यांच्यात साम्य असते.

अलंकार : ..........................................................................

२) भुजंगप्रयात या वृत्तात .............. अक्षरे असतात.

योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) बारा २) चौदा ३) पंधरा ४) यांपैकी नाही

**आ)** कंसातील समासाचा योग्य तो पर्याय निवडून तक्ता पूर्ण कर. (गुण २)

(तत्पुरुष समास, द्वंद्व समास, बहुव्रीही समास, अव्ययीभाव समास)

| सामासिक शब्द | समास |
|---|---|
| दररोज | ...................................................................... |
| मीठभाकर | ...................................................................... |

**इ)** संधी कर. (गुण १)

वाचन + ईय = ...............................

**ई)** खालील वाक्यांचा काळ ओळखून लिही. (गुण २)

१) फूल वाऱ्याने डुलत होते.

२) मी उद्या गावाला जाईन.

■■■